# मुंबई विद्यापीठ

**No. Aff./ICC/ (2024-25)/ 23 / of 2024**

## परिपत्रक:

**विषय: आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र (ACKVK) महाविद्यालयांमध्ये सुरू करण्याबाबत आणि मुख्यमंत्री युवा कार्य योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने आयोजित केलेल्या बैठकीस उपस्थित राहणेबाबत...**

संदर्भ:— १) सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई, पत्र क्र. ४/विकामुं/तांत्रिक ३/२०२४/२८५४, दि. १६ ऑगस्ट, २०२४

२) राजेंद्र क्षीरसागर, जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचे पत्र क्रमांक/कौशल्य/विकास केंद्र/२०२४, दिनांक १३/०८/२४

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित **मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हयातील, कला, वाणिज्य, विज्ञान, तंत्रनिकेतन तसेच अभियांत्रिकी, फार्मसी, आर्किटेक्चर व मॅनेजमेंट महाविद्यालयांच्या संचालक/** प्राचार्य यांना सदर परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, **आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र (ACKVK)** आणि **मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनांची अंमलबजावणी** दिलेल्या उद्दिष्टांच्या प्रमाणात झाली नसल्याने तसेच सदरहू दोन्ही योजनांची माहिती गरजू लाभार्थ्यांपर्यंत पोहचण्याच्या अनुषंगाने **दिनांक २१ ऑगस्ट, २०२४ रोजी सकाळी १०.०० वाजता ग्रीन टेक्नॉलॉजी सभागृह, कलीना विद्यापीठ आवार, सांताक्रुझ (पुर्व), मुंबई** येथे बैठक आयोजित केली आहे. सदर बैठकीस मा. ना. श्री मंगलप्रभात लोढा, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता तथा पालकमंत्री मुंबई उपनगर, मा. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर आणि मा. जिल्हाधिकारी, मुंबई शहर आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

त्या अनुषंगाने मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हयातील कला, वाणिज्य, विज्ञान, तंत्रनिकेतन तसेच अभियांत्रिकी, फार्मसी, आर्किटेक्चर व मॅनेजमेंट महाविद्यालयांच्या संचालक/प्राचार्या यांनी सदर बैठकीसाठी उपस्थित रहावे.

Balirambh

(प्रा. बळीराम गायकवाड)
प्रभारी कुलसचिव

ठिकाण:—मुंबई—४०० ०३२
दिनांक:— २० ऑगस्ट, २०२४

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हयातील कला, वाणिज्य, विज्ञान, तंत्रनिकेतन तसेच अभियांत्रिकी, फार्मसी, आर्किटेक्चर व मॅनेजमेंट महाविद्यालयांच्या संचालक/ प्राचार्य.

महाराष्ट्र शासन

**सहसंचालक तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई**
जागतिक बँक प्रकल्पांतर्गत इमारत, पहिला मजला,
शासकीय तंत्रनिकेतन परिसर
४९, खेरवाडी, अलियावार जंग मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई ५१

फोन नं. ०२२-६९९६२३००
jtdirrom@gmail.com
www.jdteromumbai.org.in

क्र.४/विकामुं/तांत्रिक ३/२०२४/ २८५४ दिनांक :- 16 AUG 2024

प्रति,
संचालक/प्राचार्य
मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हयातील
सर्व पदवी, पदव्युत्तर पदवी व
पदविका अभ्यासक्रमाच्या संस्था

विषय :- आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र (ACKVK) महाविद्यालयांमध्ये सुरु करण्याबाबत आणि मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने आयोजित केलेल्या बैठकीस उपस्थित राहणेबाबत.

संदर्भ :- १. मा. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे पत्र क्र. कौशल्य/विकास केंद्र/२०२४ दि. १३.०८.२०२४
२. मा. सहायक आयुक्त, प्र. जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र (मुंबई उपनगर), मुंबई यांचे पत्र जा.क्र. ११/जिकौविरोवउमार्के/मु.उ.आचाकौविकें/१५७०/२०२४ दि. १६.०८.२०२४

आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र (ACKVK) आणि मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनांची अंमलबजावणी विहित उद्दिष्टाच्या प्रमाणात झाली नसल्याने तसेच सदरहु दोन्ही योजनांची माहिती गरजु लाभार्थ्यांपर्यंत पोहचवण्याच्या अनुषंगाने मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हयातील सर्व संस्थांच्या प्राचार्यांची बैठक घेण्याच्या सुचना वरील संदर्भीय पत्रान्वये देण्यांत आलेल्या आहेत.

त्याअनुषंगाने मुंबई शहर व मुंबई उपनगर या जिल्हयातील तंत्रनिकेतने तसेच अभियांत्रिकी, फार्मसी, आर्किटेक्चर व मॅनेजमेंटच्या महाविद्यालयांच्या प्राचार्यांची दि. २१ ऑगस्ट, २०२४ रोजी येथे सकाळी १०.०० वाजता ग्रीन टेक्नॉलॉजी सभागृह कलीना विद्यापीठ आवार, सांताक्रुझ (पुर्व ) बैठक आयोजित करण्यांत आलेली आहे. सदर बैठकीस मा. ना. श्री. मंगलप्रभात लोढा मंत्री कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता तथा पालकमंत्री मुंबई उपनगर, मा. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर आणि मा. जिल्हाधिकारी, मुंबई शहर आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. तरी संस्थेच्या प्राचार्यांनी सदर बैठकीस उपस्थित रहावे.

(प्रमोद अं. नाईक)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई

प्रत:- १. मा. खाजगी सचिव, मा. ना. श्री. मंगलप्रभात लोढा, मंत्री कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता तथा पालकमंत्री मुंबई उपनगर यांना माहिती करीता.
२. मा. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांना माहिती करीता.
३. मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांना माहिती करीता.
४. मा. सहायक आयुक्त, प्र. जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र (मुंबई उपनगर), मुंबई यांना माहिती करीता.